**मोटार अपघात दावा अर्ज क्र. ३०/२०१९ मधील नि.६ खालील आदेश**

अर्जदार यांनी नुकसान भरपाई मिळण्यासाठी मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १६६ नुसार केलेल्या मुख्य अर्जात या अर्जाद्वारे त्या अधिनियमाखालील कलम १४० नुसार अंतरिम नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केलेली आहे.

२. अर्जदारांचे कथनानुसार दि.२३.१२.२०१८ रोजी रात्री ११.०० वाजताचे सुमारास अर्जदार क्र.१ यांचे पती, अर्जदार क्र. २ व ३ यांचा मुलगा व अर्जदार क्र. ४ यांचा मोठा भाऊ अभिजीत विजय काळे, रा. मु.पो. सिध्देश्वर कुरोली, ता.खटाव, जि.सातारा हा पुसेगाव–कोरेगाव रस्त्यावरील कोरेगावचे हद्दीत सदगुरुनगर येथे मोटार सायकल क्र. एम.एच.११ सी.एफ.–४९२० वरुन प्रवास करत असताना सामनेवाला क्र.१ याच्या मालकीचा ट्रॅक्टर क्र. एम.एच.११ यु–७८९९ च्या चालकाने ट्रॅक्टर निष्काळजीपणे, भरधाव चालवून मोटार सायकलला धडक दिल्याने अपघात झाला. सदर अपघातात अभिजीत विजय काळे गंभीररित्या जखमी होवून मयत झाला. अपघाताचे वेळी सदरचा ट्रॅक्टर क्र. एम.एच.११ यु–७८९९ सामनेवाला क्र.१ याच्या मालकीचा होता आणि या वाहनाचा विमा सामनेवाला क्र.२ युनायटेड इंडिया इन्शुरंस कंपनी लि. या विमा कंपनीकडे उतरविलेला असल्याने सामनेवाला क्र.१ व २ हे नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत.

३. सामनेवाला क्र.१ यांचेवर नोटीसची बजावणी होऊनही ते प्रस्तुतकामी हजर झाले नाहीत. सबब त्यांचेविरुध्द अर्ज एकतर्फा चालणेबाबतचा आदेश दिनांक ०६.०१.२०२० रोजी पारीत करणेत आला. सामनेवाला क्र.२ यांनी निशाणी १७ प्रमाणे म्हणणे दाखल केले आहे.

४. अर्जदारांनी यादी नि. ४ सोबत हजर केलेले अपघाता संबंधीचे कोरेगाव पोलीस ठाणे मधील दि.२४.१२.२०१८ रोजी नोंदविलेल्या गु.र.क्र.३५२/२०१८ मधील प्रथम वर्दि अहवाल, घटनास्थळ पंचनामा यावरुन अर्जदारांच्या कथनाप्रमाणे वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी अपघात झाल्याचे आणि सदरहू वाहने त्या अपघातात सामील असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते.

५. अर्जदार यांनी हजर केलेल्या विमा प्रमाणपत्राची प्रत सकृतदर्शनी असे दर्शविते की, ट्रॅक्टर क्र. एम.एच.११ यु–७८९९ चा सामनेवाला क्र.२ यांचेकडे सामनेवाले क्र.१ यांनी मालक या नात्याने दि.२२.०९.२०१८ ते २१.०९.२०१९ या कालावधीसाठी विमा

उतरविलेला होता आणि अपघाताचे दिवशी सदरहू वाहन सामनेवाला क्र.२ यांच्याकडे विमा संरक्षित होते.

६. अर्जदार यांनी हजर केलेल्या शवाचा पंचनामा व शव विच्छेदन अहवाल यावरुन असे स्पष्ट होते की, अभिजीत विजय काळे याचा अपघातामध्ये गंभीर जखमी झाल्यामुळे मृत्यू झालेला आहे. वरील सर्व परिस्थितीत अर्जदार हे कलम १४० अन्वये अंतरिम नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत आणि सामनेवाले क्र.१ व २ हे स्वतंत्र आणि संयुक्तिकरित्या सदर नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र.१ व २ यांनी स्वतंत्र आणि संयुक्तिकरित्या नुकसान भरपाई म्हणून रक्कम रु.५०,०००/– (रु. पन्नास हजार फक्त) या आदेशापासून ३० दिवसांचे आत धनादेशाद्वारे द्यावेत. त्यापैकी अर्जदार क्र.१ यांना र.रु.३५,०००/– (रु.पस्तीस हजार फक्त) आणि अर्जदार क्र.२ ते ४ यांना प्रत्येकी र.रु.५,०००/– (रु.पाच हजार फक्त) रेखांकित धनादेशाद्वारे द्यावेत. सदरहू रक्कम मुदतीत न दिल्यास त्यावर अर्ज दाखल तारखेपासून संपूर्ण रक्कम फिटेपर्यंत द.सा.द.शे. ७.५ टक्के दराने व्याज देण्यास सामनेवाला क्र.१ व २ जबाबदार राहतील.

३. येणेप्रमाणे अंतरिम निवाडा करण्यात यावा.

सातारा
दिनांकः २२.०१.२०२१

( राजेंद्र द. सावंत )
अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण
सातारा.